Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-
Final Plot No. 178,179, Near Balchitrawa
Behind Agharkar Research Institute,
Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा-८/ 4544
पुणे - ४११००४
दिनांक - २५ नोव्हेंबर २०२४

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेषअतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

संदर्भ :– १. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२००२(६६/०२)/उमाशि-२ दिनांक २३ एप्रिल, २००३.
२. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ९३ अन्वये फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि. २२/११/२०२४ रोजी संपुष्टात येत आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु. ५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु. १००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. १०/२/२०२५ पर्यंत रु.२००/- प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

लेखी परीक्षा दि. ११/०२/२०२५ रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

परीक्षा	अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा	शनिवार दि.२३/११/२०२४ ते मंगळवार दि.२४/१२/२०२४	बुधवार दिनांक २५/१२/२०२४ ते बुधवार दिनांक ०८/०१/२०२५	गुरूवार दिनांक ०९/०१/२०२५ ते सोमवार दिनांक १०/०२/२०२५

--२---

Created with cam scan

१) सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Account मध्ये कोणत्याही बँकेद्वारे RTGS/NEFT द्वारे त्वरीत जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application status मध्ये Send to board व Payment status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने स्विकारून व त्याचे status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी.

२) त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prelist मध्ये दुरुस्त्या सांगितलेल्या असल्यास Online पद्धतीने ०५ डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्याबाबत कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

३) प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

४) मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

५) सोबत जोडलेल्या विहीत तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांची शिफारस व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याबाबतही सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

६) राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी दिनांक १०/०२/२०२५ पर्यंत घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदनपत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत. **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४

सोबत - परिशिष्ट अ.

क्र.मुविम/उमाप/ २९३७
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३
दिनांक २६/११/२०२४

प्रति,
प्राचार्य,
मुंबई विभाग कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
मुंबई / बृहन्मुंबई / ठाणे / पालघर / रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून आवश्यक ती उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र.विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१. मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मुंबई / ठाणे / रायगड
३. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई विभाग (पश्चिम/दक्षिण/उत्तर)
४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार / डहाणू / शहापूर / पेण / पालघर

प्रत माहितीस्तव :- मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

Created with cam scan

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नाव: ----------

विभागीय मंडळाचे नाव: ---------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांक: ----------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

इ. १२ वी

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------

२) क. म. वि. नाव व पत्ता : ----------

३) क. म. वि. सांकेतिक क्रमांक : ----------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

(याबाबत नियमित विद्यार्थ्यांची हजेरी तपासून सदरचे कारण ग्राहय धरावे.)

६) कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोखा/चलन क्रमांक ----------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ९३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का

Created with cam scan